# प्रेसनोट

दि.२७.०७.२०१९

शिर्षक :- प्राथमीक आरोग्य केंद्र, कुरळप येथील श्री. नितीन बापु चिवटे, वैदयकीय अधिकारी, प्राथमीक आरोग्य केंद्र, कुरळप यांना ३०/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | कुरळप पोलीस स्टेशन, गुरनं १५५/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | श्री. नितीन बापु चिवटे, वय ४६ वर्षे, वैदयकीय अधिकारी, प्राथमीक आरोग्य केंद्र, कुरळप ता. वाळवा रा. डॉ. चिटणीस बिल्डींग, गणेशनगर, इस्लामपुर, ता. वाळवा, जि. सांगली, मुळ रा. चिकुर्डे, ता. वाळवा, जि. सांगली वर्ग- १ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी आरोग्य केंद्र कुरळप येथील आरोग्य अधिकारी डॉ. श्री. चिवटे हे दवाखान्यात येणा-या प्रत्येक पेशंट कडुन औषधउपचार करण्यासाठी प्रत्येकी ३०/-रुपये व सलाईनसाठी प्रत्येकी १००/- रुपये पैशाची मागणी करीत असतात. शासनाकडुन प्राथमीक आरोग्य केंद्रात येणा-या प्रत्येक पेशंटला मोफत औषधउपचार करण्याची सुविधा असताना देखील डॉ. चिवटे हे पेशंट कडुन पैसे घेतल्याशिवाय औषधउपचार करीत नाहीत. सदर तक्रारीची शहानिशा करुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबत तक्रारदार यांनी ला.प्र.वि. सांगली येथे दि. २४.०७.२०१९ रोजी तक्रारी अर्ज दिला होता तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि.२५.७.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. चिवटे, वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कुरळप यांनी तक्रारदार यांचेवर औषधउपचार करुन त्यांचेकडे औषधउपचाराचे ३०/-रुपये लाच मागणी केली असता तक्रारदार यांनी ३०/- रुपये नसल्याचे सांगीतले असता डॉ. चिवटे यांनी ३०/-रुपये आणुन देणेबाबत सांगीतलेचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दि. २६.७.२०१९ रोजी तक्रारदार हे डॉ. चिवटे यांचे मागणी प्रमाणे ३०/-रुपये देणेसाठी प्राथमीक आरोग्य केंद्र कुरळप येथे गेले. त्यावेळी सापळा लावला असता श्री. नितीन बापु चिवटे, वय ४६ वर्षे, वैदयकीय अधिकारी, प्राथमीक आरोग्य केंद्र, कुरळप ता. वाळवा रा. डॉ. चिटणीस बिल्डींग, गणेशनगर, इस्लामपुर, ता. वाळवा, जि. सांगली, मुळ रा. चिकुर्डे, ता. वाळवा, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ३०/-रुपये लोचेची मागणी करुन स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचेविरुध्द कुरळप पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबेंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.**

संपर्क पत्ता :- **पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६**

संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**

ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**

ऑनलाईन तक्रार ॲप :- **acbmaharashtra.net** टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५ व्हॉट्सॲप क्रमांक :- ९८२३६१८००१